वाचले:-१) **मे. प्राईड पर्पल प्रॉपर्टीज व प्राईड पर्पल इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे भागीदार, श्री. अरविंद प्रेमचंद जैन, रा. ५ वा मजला प्राईड हाऊस, स.नं. १०८/७, पुणे विद्यापीठ रोड, शिवाजीनगर, पुणे-१६** यांचा महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे यांचे कार्यालयाकडे केलेला **दिनांक-०५/०७/२०१८** रोजीचा अर्ज.

२) महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे कार्यालयाकडील **क्र. बीएमयु/मौजे मारूंजी /स.नं./ग.नं. ४०/१/१ व इतर/ प्र.क्र.२८१/१८-१९/१७९,दिनांक-०५/०७/२०१८** रोजीचे पत्र.

३) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील महाराष्ट्र अध्यादेश क्र. २ दिनांक. ०५/०१/२०१७.

४) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील परिपत्रक क्र. एनएए-२०१७/प्र.क्र.११५/ टी-१ दिनांक-१९ ऑगस्ट २०१७

---

**जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा, तिचा धारणाधिकार, अकृषिक आकारणी आणि ती वरील भार याबाबत पत्र**

**(महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२क)**

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
(महसूल शाखा)
क्र.मुळशी/एनए/एसआर/७५/२०१८
पुणे, दिनांक- २३/०८/२०१८

**प्रति,**

महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
सयाजीराव गायकवाड, उद्योग भवन औंध पुणे-०७

**विषय:-जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा, तिचा धारणाधिकार, अकृषिक आकारणी आणि ती वरील भार याबाबत पत्र**

मौजे मारूंजी, ता. मुळशी, जि. पुणे येथील जमीन ग.नं/स.नं. ४०/१/१, ४०/१/२, ४०/२, ४०/३, ४०/४/१, ४०/४/२, ४०/५, ४०/६, ४०/७, ४०/८, ४०/९/१, ४०/९/२, ४०/१०, ४१/१, ४१/१/१, ४१/१/२, ४१/२, ४१/३/१, ४१/३/२, ४१/३/२, ४१/४/१, ४१/४/२, ४१/५, ४१/६/१, ४१/६/२, ४४/२, ५१/७/२, ५१/८ मधील एकुण क्षेत्र २३३९००.०० चौ.मी. प्रयोजन निवासी

संदर्भ:- आपले कार्यालयाकडील क्र. **बीएमयु/मौजे मारूंजी /स.नं./ग.नं. ४०/१/१ व इतर/ प्र.क्र.२८१/१८-१९/१७९,दिनांक-०५/०७/२०१८** रोजीचे पत्र.

महोदय,

विषयांकीत पत्रान्वये, **मौजे मारूंजी, ता. मुळशी, जि. पुणे येथील जमीन ग.नं/स.नं. ४०/१/१, ४०/१/२, ४०/२, ४०/३, ४०/४/१, ४०/४/२, ४०/५, ४०/६, ४०/७, ४०/८, ४०/९/१, ४०/९/२, ४०/१०, ४१/१, ४१/२, ४१/३/१, ४१/३/२, ४१/३/२, ४१/४/१, ४१/४/२, ४१/५, ४१/६/१, ४१/६/२, ४४/२, ५१/७/२, ५१/८ मधील एकुण २३३९००.०० चौ.मी. क्षेत्रास निवासी** प्रयोजनासाठी महाराष्ट्र जमिन

महसूल अधिनियम १९६६ चे कलम १८ नुसार रेखांकन/बांधकाम परवानगी मिळणेबाबत **दिनांक-०५/०७/२०१८** रोजी अर्जदार **मे. प्राईड पर्पल प्रॉपर्टीज व प्राईड पर्पल इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे भागीदार, श्री. अरविंद प्रेमचंद जैन, रा. ५ वा मजला प्राईड हाऊस, स.नं. १०८/७, पुणे विद्यापीठ रोड, शिवाजीनगर, पुणे-१६** यांनी आपले कार्यालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे.

२. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. एनएए-२०१७/ प्र.क्र.११५/ टी-१ दिनांक- १९/०८/२०१७ मधील तरतूदींनुसार आपण आपले कडील **पत्र क्र. बीएमयु/ मौजे मारूंजी /स.नं./ग.नं. ४०/१/१ व इतर/ प्र.क्र.२८१/१८-१९/१७९,दिनांक-०५/०७/२०१८** अन्वये सदर जमिनीच्या संदर्भातील भोगवटा/धारणाधिकार/अधिभार/अकृषिक आकारणी व इतर शासकीय देणी या मुद्दयांची माहिती मिळणेकामी प्रस्तुतचा प्रस्ताव व त्यालगतची कागदपत्रे या कार्यालयाकडे सादर केलेली आहेत.

**३.** त्यानुसार महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. एनएए-२०१७ /प्र. क्र.११५/टी-१ दिनांक-१९/०८/२०१७ मधील तरतूदींनुसार शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र. (I) (२) (i) मधील **(अ)** ते **(इ)** मध्ये नमुद मुद्यांचे अनुषंगाने खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

४. **मौजे मारूंजी, तालुका मुळशी, जिल्हा पुणे** येथील खालील वर्णनाची जमीन जमिनमालक यांचे हक्कनोंदणीस दाखल आहे.

| **अ.क्र** | **जमिन मालकाचे नाव** | **सर्व्हे नं./गट नं.** | **प्रस्तावित क्षेत्र (चौ.मी)** |
|---|---|---|---|
| १ | अरविंद प्रेमचंद जैन<br>प्राईड पर्पल इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे भागीदार<br>श्रवण देवकीनंदन अगरवाल | ४०/१/१ | १८५०.०० |
| २ | | ४०/१/२ | १८५०.०० |
| ३ | | ४०/२ | १३४००.०० |
| ४ | | ४०/३ | १५८००.०० |
| ५ | | ४०/४/१ | ९६५०.०० |
| ६ | | ४०/४/२ | ९६५०.०० |
| ७ | | ४०/५ | ४३००.०० |
| ८ | | ४०/६ | ३७००.०० |
| ९ | | ४०/७ | २३००.०० |
| १० | | ४०/८ | १९००.०० |
| ११ | | ४०/९/१ | ३०००.०० |
| १२ | | ४०/९/२ | २९००.०० |
| १३ | | ४०/१० | ६८००.०० |
| १४ | | ४१/१ | १९७३०.०० |
| १५ | | ४१/२ | २१६२०.०० |
| १६ | | ४१/३/१ | १२०००.०० |
| १७ | | ४१/३/२ | १२०००.०० |
| १८ | | ४१/४/१ | ११३००.०० |
| १९ | | ४१/४/२ | ११२००.०० |
| २० | | ४१/५ | १८३००.०० |
| २१ | | ४१/६/१ | ५०५०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | | ४१/६/२ | ५०५०.०० |
| २३ | सुरेश रामचंद्र सणस | ४४/२ | ८०००.०० |
| २४ | | ५१/७/२ | १४१५०.०० |
| २५ | | ५१/८ | १८४००.०० |
| **एकूण क्षेत्र** | | | **२३३९००.००** |
| रेखांकन/बाधकाम नकाशामध्ये समाविष्ठ केलेले क्षेत्र | | | **२३३९००.००** |
| **अकृषिक सारा आकारणीचे प्रयोजन** | | | **निवासी** |

**५.**विषयांकीत जमिन ही **भोगवटादार वर्ग-१** ची आहे.

**६.**या कार्यालयातील उपलब्ध ॲलिनेशन रजिस्टर मधील नोंदी पहाता सदर जमीन **वतनाची** असलेची दिसून येत नाही.

**७.**विषयांकीत जमिनीचे अधिकार अभिलेखाच्या **इतर हक्कामध्ये अर्जदार यांचेशी संबंधित कोणत्याही प्रकारचा भार अथवा बोजा दिसून येत नाही**.

८.सन १९५० पासूनचे ७/१२ उतारे व त्यावरील फेरफार नोंद यावरुन सदरची जमिन खाजगी/ राखीव वनसंवर्गात मोडत नाही.

**९.**प्रस्तुत जमीन कुळकायदा संवर्गातील असलेचे दिसून येत नाही.

**१०.** जमीन स.नं. ४०/१/१, ४०/१/२, ४०/२, ४०/३, ४०/४/१, ४०/४/२, ४०/५, ४०/६, ४०/७, ४०/८, ४०/९/१, ४०/९/२, ४०/१० चे इतर हक्कामध्ये औद्योगीक क्षेत्र संपादन असा शेरा दिसून येत आहे.

उपजिल्हाधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी-२, म.औ.वि.म. पुणे यांचेकडील क्र. मऔविम/प्रा. अ.पुणे-२/२२०१/१८,दि-२७/०७/२०१८ रोजीचे पत्र पाहता, मौजे मारूंजी येथील जमीन स.नं. ४० पै. ०.४७७० हे. आर क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कोणत्याही प्रयोजनासाठी अधिसुचित करण्यात आलेला नसलेबाबत नमुद केले आहे.

तसेच नियोजनात समाविष्ठ केलेले क्षेत्र औद्योगीक प्रयोजनार्थ संपादन केलेल्या क्षेत्राने बाधीत होत नसलेबाबतची खाजरजमा नियोजन प्राधिकारी म्हणून आपले कार्यालयाचे स्तरावरून करूनच रेखांकन/बांधकाम नकाशांना परवानगी देणे अपेक्षित आहे.

**११.**प्रकरणी या कार्यालयाकडील **पत्र क्र./मुळशीएनए/एसआर/७५/२०१८, दिनांक-२१/०८/२०१८** अन्वये खालीलप्रमाणे अकृषिक सारा, रूपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी शासन जमा करणेबाबत अर्जदार यांना कळविणेत आलेले होते.

| **अ.क्र.** | **तपशील** | **रक्कम** |
|---|---|---|
| १ | बिगरशेती आकारणीचे प्रयोजन | **निवासी** |
| २ | बिगरशेती आकारणी क्षेत्र (चौ.मी.) | **२३३९००.००** |
| ३ | बिनशेती आकारणीचा दर (प्रति चौ.मी.) | ०.१० |
| ४ | बिनशेती करावयाच्या क्षेत्रावरील वार्षिक आकारणी | २३३९०.०० |
| ५ | रुपांतरीत कराची आकारणी | ११६९५०.०० |
| ६ | जिल्हा परिषद कर | १६३७३०.०० |
| ७ | ग्रामपंचायत कर | २३३९०.०० |
| **वसूल करावयाची एकूण रक्कम रुपये** | | **३२७४६०.००** |

त्यानुसार वरीलप्रमाणे नमुद अकृषिक सारा, रूपांतरण कर तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी शासन जमा केलेबाबत अर्जदार यांनी चलन **क्र. एम.एच. ००५२७७२२७ २०१८१९ एम, दिनांक-२१/०८/२०१८** या कार्यालयास सादर केले आहे.

**११.** नागरी कमाल जमिन धारणा कायद्यांतर्गत असलेल्या केसेस (यु.एल.सी.), कुलमुख्त्यारपत्र, वनजमीन, मोजणी नकाशा, जागा पाहणी, विद्युतवाहीनी, भुसंपादन, पर्यावरण विभाग ना-हरकत (Environment Clearance), एअर फोर्स, रेडझोन परिक्षेत्र (वर्क्स ऑफ डिफेन्स ॲक्ट) उदा. देहु ॲम्युनेशन डेपो, दिघी मॅगेझिन, उच्च ऊर्जा पदार्थ अनुसंधान प्रयोगशाळा (HEMRL), INS शिवाजी, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA), पर्यावरण संवेदनशिल असलेली गांवे (ESA) इ. तांत्रिक बाबींची खात्री नियोजन प्राधिकारी म्हणुन **महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर विकास क्षेत्र प्राधिकरण, पुणे** यांनी त्यांचे स्तरावर करूनच रेखांकन/बांधकाम नकाशांना परवानगी देणे अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे विषयांकीत जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा, तिचा धारणाधिकार, ती वरील अधिभार रूपांतरण कर, अकृषिक आकारणी तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी याबाबतची वस्तुनिष्ठ माहिती सादर करण्यात येत आहे. तरी विषयांकीत जमिनीवरील रेखांकन/बांधकाम आराखडयांना उपरोक्त नमुद बाबींच्या पडताळणी अंती मंजूरी देण्याबाबत शासन परिपत्रक दि.१९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (ii) मध्ये नमुद केलेप्रमाणे आपले स्तरावर विहित मुदतीत पुढील योग्य ती कार्यवाही करावी. सोबत मुळ संचिका पान **क्र. १ ते १००९** जोडली असे.

**मा. जिल्हाधिकारी सो यांचे मान्यतेने** }

सही/-xxx
**(प्रल्हाद हिरामणी)**
**तहसिलदार महसुल**

**प्रत:- मे. प्राईड पर्पल प्रॉपर्टीज व प्राईड पर्पल इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे भागीदार, श्री. अरविंद प्रेमचंद जैन,** रा. ५ वा मजला प्राईड हाऊस, स.नं. १०८/७, पुणे विद्यापीठ रोड, शिवाजीनगर, पुणे-१६

शासन परिपत्रक दिनांक- १९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (iv) मध्ये नमुद केलेप्रमाणे पुणे महानगर विकास क्षेत्र प्राधिकरण यांनी त्यांचे स्तरावर रेखांकन/बांधकाम नकाशांना परवानगी दिलेनंतर **रेखांकन/बांधकाम परवानगीची साक्षांकीत प्रत या कार्यालयाकडे सादर करावी.** जेणेकरून प्रस्तुत जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ मध्ये जमिन अकृषिक झाल्याची नोंद घेणेकामी पुढील आवश्यक ती कार्यवाही करता येईल.

**(प्रल्हाद हिरामणी)**
**तहसिलदार महसुल**